दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक १४० वा मंगळवार दि.२४ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## काँग्रेस मध्य प्रदेश विधानसभा निवडणूक जिंकणार?

भोपाळ : मध्य प्रदेशात पुढील महिन्यात होणारी विधानसभा निवडणूक ही प्रामुख्याने काँग्रेस आणि भाजप या दोन पक्षांमध्ये होणार आहे. उत्तर प्रदेश किंवा बिहारप्रमाणे येथे मुस्लिम मतांची टक्केवारी ही तुलनेने कमी असली तरी येथील किमान २२ जागांवर तरी मुस्लिम मते निर्णायक ठरू शकतात.मध्यप्रदेशात २०१८ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या मतांचे प्रमाण ३ ते ४ टक्क्यांनी वाढल्याने अटीतटीच्या लढतीत काँग्रेस थोड्या फरकाने भाजपच्या पुढे गेला, असे प्रतिपादन मध्य प्रदेश मुस्लिम विकास परिषदेचे निमंत्रक आणि काँग्रेसचे नेते महंमद माहीर यांनी केला आहे.मध्य प्रदेशचे काँग्रेसचे नेते कमलनाथ यांनी २०१८ मध्ये सांगितले होते की, जर अल्पसंख्याकांची मते काँग्रेसला मिळाली तर काँग्रेस येथे सत्ता स्थापन करेल आणि कमलनाथ यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत येथील मुस्लिमांनी एकगठ्ठा मते काँग्रेसला दिली आणि यामुळे पराभव झालेल्या जागांपैकी १० ते १२ जागांवर काँग्रेसला विजय मिळाला, असेही माहीर यांनी सांगितले. विशेष म्हणजे मागील विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या मतांचा टक्का हा काँग्रेसच्या तुलनेत अधिक होता असे असूनही त्या निवडणुकीनंतर आमदारांच्या संख्याबळाच्या बाबतीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला होता.२०११ मधील जनगणनेनुसार मध्य प्रदेशात मुस्लिमांची लोकसंख्या ही साधारण सात टक्के होती. ती आता वाढून साधार दहा टक्क्यांपर्यंत गेली असल्याचे गृहीत धरले तरी मध्य प्रदेशातील ४७ विधानसभा मतदार संघांत मुस्लिम मतांचे प्रमाण हे लक्षणीय असून २२ मतदार संघांत ते निर्णय आहे असा दावा माहीर यांनी केला आहे. माहीरांच्या दाव्या नुसार मध्य प्रदेशातील जनता ही भाजप सरकारच्या कारभाराला वैतागले तेव्हा ती भाजपचे सरकार पाडते, परंतु येथील काँग्रेसचे मतदार ज्यांच्यामध्ये मुस्लिमेतरांचा देखील समावेश होतो.

## दसरा महोत्सवाच्या भव्य मिरवणुकीत हजारोंच्या संख्येने सहभागी होवून परंपरा जपा स्वागताध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांचे आवाहन

लातूर दि.२३: सिद्धेश्वरनगरी म्हणून ख्याती असलेल्या लातूर शहराची जवळपास २०० वर्षांपासूनची परंपरा असलेल्या सामुदायिक दसरा महोत्सवाच्या यंदाच्या सुवर्णमहोत्सवी भव्य मिरवणुकीत लातूरकरांनी हजारोंच्या संख्येने सहभागी होवून ही परंपरा जपावी, असे आवाहन सामुदायिक दसरा महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी रविवारी येथे केले.लातूरची ही महोत्सव समिती गेल्या ५० वर्षांपासून महर्षि दयानंद क्रीडा व व्यायाम मंडळाच्या नेतृत्वाखाली सामुदायिक दसरा महोत्सव साजरा करण्याची परंपरा पाळत आहे. ही परंपरा खंडित होता कामा नये, या भूमिकेतून आपण सर्व लातूरवासियांनी महोत्सव समितीच्या अतिभव्य शोभायात्रेत सहभागी होवून विजयादशमीचा क्षात्रतेज जागविणारा सण साजरा करावा, असे आ. कराड म्हणाले. यंदा या सामुदायिक महोत्सवाचे ५१ वे वर्ष असून, या महोत्सवाचा एक भाग म्हणून कालच्या शनिवारी येथील प्रणवश्री मंगल कार्यालय सभागृहात दांडिया महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. शेकडो बंधू-भगिनींनी सिनेगीतांच्या लयबद्ध ठेक्यावर बेभान होवून दांडिया सादर केला. गायक छोटू हिबारे व त्यांच्या सहकारी गायक-गायिकांनी तालबद्ध पावले स्वत: टाकत आपल्या गीतांनी दांडिया कलावंतांना भारावून टाकले, असे ते म्हणाले.मराठवाडा मुक्तिलढ्याचा देखावा हे आकर्षण सामुदायिक दसरा मिरवणुकीचे यंदाचे एक आगळेवेगळे आकर्षण आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील कलावंत विद्यार्थ्यांनी सादर केलेला मुक्तिसंग्रामाचा जिवंत देखावा या मिरवणुकीत लातूरकरांना पहावयास मिळणार आहे. मुक्तिलढ्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ, पत्रकार अनंत भालेराव, सातवा व शेवटचा निजाम मीरउस्मानअली, राघवेंद्रराव दिवाण आदींच्या वेशभूषेत हे कलावंत लक्ष वेधून घेतात. यानिमित्ताने मुक्तिलढ्याचा इतिहास सामुदायिक दसरा महोत्सवाच्या शोभायात्रेच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचिवण्याचाही समितीचा मानस आहे, असे आ. कराड यांनी सांगितले. महोत्सवाची जय्यत तयारी



जवळपास पूर्ण झाली असून, २४ तारखेला मंगळवारी विजयादशमीदिनी दुपारी ४ वाजता आर्य समाज (गांधी चौक) येथे ध्वजारोहण, शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या यशवंत व्यक्तींचा सन्मान हे कार्यक्रम होतील. या मिरवणुकीत यावेळी सीआरपीएफचे जवळपास ३०० जवान सहभागी होणार असून, वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने मिरवणुकीत पर्यावरणपूरक देखावाही सादर केला जाणार आहे. खा. सुधाकरजी शृंगारे यांची यावेळी उपस्थिती राहणार असून त्यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. ना. संजय बनसोडे व अन्य प्रतिष्ठीत मंडळीही मिरवणुकीत सहभागी होणार आहेत, असे आ. कराड शेवटी म्हणाले.










## उजनीतून शेतीसाठी पहिले आवर्तन १ नोव्हेंबरपासून

सोलापूर : सोलापूरसह पुणे व नगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनीत सध्या ५८ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. यंदाच्या पावसाळ्यात धरण ६६ टक्क्यांपर्यंतच भरले असून शेतीसाठी पहिले आवर्तन १ नोव्हेंबरपासून सोडले जाणार आहे. सलग ४० दिवस शेतीला पाणी सोडल्यानंतर पुन्हा जानेवारीत शेवटचे आवर्तन सोडले जाईल. त्यानंतर सर्व पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवले जाणार असल्याची माहिती लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.खरीप हंगामात पावसाळा सुरु असतानाही जिल्ह्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील बार्शी, करमाळा, माढा, माळशिरस व सांगोला हे पाच तालुके दुष्काळाच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. त्यावेळी पिकांसाठी पाणी सोडण्याची मागणी झाली, पण उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा ३३ टक्क्यांपेक्षा कमी असल्याने पाणी सोडता आले नाही. आता रब्बी पिकांसाठी उजनीतून दोन आवर्तने सोडली जाणार आहेत.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबरपर्यंत पहिले आवर्तन सुटेल आणि त्यासाठी किमान ८ टीएमसी पाणी लागेल, असा अंदाज आहे. सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून पाणी सोडल्यानंतर पुन्हा कॅनॉलमधून शेतीला पाणी सोडण्यास अडचणी येतात. त्यामुळे एक महिन्याच्या अंतराने दुसरे आवर्तन शेतीसाठी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुढच्या वर्षीच्या

## आदर्श कारखाना कसा असतो, याचा वस्तुपाठ घालून देऊ सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांचा विश्वास; मांजरा परिवारात नवा कारखाना दाखल; उत्साहाच्या वातावरणात कंचेश्वर शुगरचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ संपन्न

लातूर / तुळजापूर : कंचेश्वर साखर कारखान्याच्या माध्यमातून धाराशिवमधील शेतकऱ्यांचा विकास करण्याची संधी मांजरा परिवाराला मिळाली आहे. त्यामुळे लातूरप्रमाणेच धाराशिवमध्येही आम्ही परिवर्तन करून दाखवू. येणाऱ्या काळात कंचेश्वर शुगरच्या माध्यमातून आदर्श कारखाना कसा असतो, याचा वस्तुपाठ आम्ही घालून देऊ, असा विश्वास सहकारमहर्षी, माजी मंत्री श्री. दिलीपराव देशमुख यांनी सोमवारी येथे व्यक्त केला.मांजरा परिवारात नव्याने दाखल झालेल्या तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ (जि. धाराशिव) येथील कंचेश्वर शुगरचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ सहकारमहर्षी, माजी मंत्री श्री. दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते व 'लातूर ग्रामीण'चे आमदार, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. धिरज विलासराव देशमुख, सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न




झाला.माजी मंत्री श्री. दिलीपराव देशमुख म्हणाले, धाराशिव लातूरचा

मोठा भाऊ आहे. धाराशिवसोबत विलासराव देशमुख आणि देशमुख कुटुंबीयांचे जुने नाते आहे. त्यामुळे येथे कंचेश्वर शुगरच्या माध्यमातून समाजकारण करू. शेतकर्यांना केंद्रभागी ठेवून कंचेश्वर शुगरची वाटचाल सुरू राहील. येथील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न करू. मांजरा परिवाराप्रमाणेच येथील शेतकऱ्यांना चांगला भाव देऊ. सर्वांना सोबत घेऊन शेतकरी, कामगार, साखर कारखान्याचे हीत साधण्याचा आमचा प्रयत्न असेल.शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षा पूर्ण करू :आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, दुष्काळी भागातील शेतकरी ताठ मानेने जगला पाहिजे, तो आर्थिक सक्षम झाला पाहिजे, या विचाराने माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांनी लातूरमध्ये मांजरा साखर कारखान्याची उभारणी व विस्तार केला. यामुळे लातूर जिल्ह्याचा विकास झपाट्याने झाला. हा विकास इथल्या भागातही व्हावा, यासाठी मांजरा परिवाराचे युनिट येथे सुरू व्हावे, अशी अनेकांची इच्छा होती. यानुसार कंचेश्वर कारखान्याच्या रुपाने मांजरा परिवारातील नवा कारखाना येथे सुरु होत आहे, याचा आनंद आहे. या कारखान्याच्या माध्यमातून येथील शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षा येणाऱ्या काळात पूर्ण करू.यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, लातूर जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष ड. श्रीपतराव काकडे, मुकुंदराव डोंगरे, मारुती महाराज साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्याम भोसले, संभाजी रेड्डी, सतीश पाटील, जागृती शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले, कंचेश्वर शुगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, वर्क्स मॅनेजर अजित कदम, आर. के. कदम यांच्यासह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व उस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# आता 'इंडिया'चे काय होणार?

मध्य प्रदेशमधील काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या भांडणात विरोधकांच्या 'इंडिया'चे काय होणार असा प्रश्न या महाआघाडीतील घटक पक्षांना पडू लागला आहे. महेश सरलष्कर घटक पक्षांचे राजकीय बळ अनेक राज्यांत 'इंडिया'ला तारूनही नेईल; पण मध्य प्रदेशात समाजवादी पक्ष आणि  यांच्यात झालेला बेबनाव लोकसभेसाठी उत्तर प्रदेशात महागात पडू शकतो.. मध्य प्रदेशमधील काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या भांडणात विरोधकांच्या 'इंडिया'चे काय होणार असा प्रश्न या महाआघाडीतील घटक पक्षांना पडू लागला आहे. 'इंडिया'च्या घटक पक्षांतील मतभेदांमुळे भाजपला आनंदाच्या उकळ्या फुटू शकतात. घटक पक्ष म्हणतात की, काँग्रेसने मोठ्या मनाने सगळ्यांना सामावून घेतले पाहिजे. तर काँग्रेसचे म्हणणे आहे की, मध्य प्रदेशमधील एक-एक जागा महत्त्वाची आहे. काँग्रेसला अनुकूल परिस्थिती असेल तर 'सप'ला जागा द्यायच्या कशाला? भाजपला हरवण्याची संधी चालून आली असेल तर त्यात इतर पक्षांना वाटेकरी कशाला करायचे, असा विचार काँग्रेसने केलेला दिसतो. म्हणूनच काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे दावेकरी कमलनाथ यांनी, 'कोण ते अखिलेश-वखिलेश?', असे विधान करून 'सप'चे प्रमुख अखिलेश यादव यांच्या आरोपांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असावे. त्यावर, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न केल्यामुळे कमलनाथ यांना दिल्लीकरांचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले आहे.काँग्रेसच्या या अरेरावीमुळे 'इंडिया'तील घटक पक्ष काहीसे नाराज झालेले आहेत. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, भाजपला पराभूत करण्यासाठी 'इंडिया'ची स्थापना झाली असेल तर, ही महाआघाडी राज्यांमध्येही झाली पाहिजे. मध्य प्रदेशमध्ये जिथे 'सप'चे उमेदवार जिंकण्याची शक्यता असतील अशा पाच-सहा जागा आम्हाला द्या. बाकी तुम्ही लढवा! पण, काँग्रेसने 'सप'चे ऐकलेले नाही. उत्तर प्रदेशमध्ये 'सप'ने जशास तसे वागायचे ठरवले तर काँग्रेस काय करणार, असे विचारले जाऊ शकते.'इंडिया'च्या मुंबईतील बैठकीनंतर प्रामुख्याने काँग्रेसचे लक्ष पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीकडे केंद्रित झाले आहे. राहुल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेला मिळालेल्या प्रतिसादानंतर आणि कर्नाटकच्या विजयानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा या चारही मोठ्या राज्यांमध्ये काँग्रेसला यशाची खात्री वाटू लागली आहे. मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सत्ता मिळू शकेल, राजस्थानमध्ये तुल्यबळ लढाई होईल, असे राहुल गांधींनी एका जाहीर कार्यक्रमामध्ये सांगितले होते. तेलंगणामध्ये रेवंत रेड्डी यांच्याकडे सर्वाधिकार दिल्यानंतर काँग्रेसने राज्यातील वातावरण बदलून टाकल्याचे सांगितले जाते. आत्ता-आत्तापर्यंत काँग्रेसमधून नेते भारत राष्ट्र समिती (बीआरएस) वा भाजपमध्ये जात होते. आता 'बीआरएस'मधून नेते काँग्रेसमध्ये येऊ लागले आहेत. भाजपने कितीही गाजावाजा केला तरी तेलंगणामध्ये त्यांची डाळ शिजण्याची शक्यता नाही असे विश्लेषकांचे म्हणणे आहे. इथे लढाई 'बीआरएस' आणि काँग्रेस यांच्यामध्ये होणार असून लोकांच्या नाराजीचा काँग्रेसला मोठा लाभ मिळेल असे पक्षाला वाटते. मिझोरमसह पाचही राज्यांमध्ये सत्ता मिळण्याची आशा काँग्रेसला वाटू लागल्याने काँग्रेसचे 'इंडिया'कडे दुर्लक्ष झालेले आहे. या राज्यांमध्ये काँग्रेसने चांगली कामगिरी केली वा त्यांची सत्ता स्थापन झाली तर आगामी लोकसभा निवडणुकीतही यश मिळेल असा विचार काँग्रेस करत आहे. त्यांच्या या राजकीय मांडणीमध्ये तथ्यही असू शकते. गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये काँग्रेसला भाजपशी लढावे लागेल. उत्तरेतील सुमारे २०० लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढाई होणार आहे. या जागांवर काँग्रेसला अधिकाधिक जागांवर भाजपचा पराभव करता आला तर केंद्रातील सत्तेचे गणित पूर्णपणे बदलू शकते. या दोनशे जागांवर काँग्रेसला 'इंडिया'च्या घटक पक्षांची फारशी गरज नाही.महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचा समावेश आहे, तिथे जागावाटपाची चर्चा सुरू आहे. गुजरातमध्ये काँग्रेसला कदाचित आम आदमी पक्षाची मदत लागू शकते. तिथल्या विधानसभेत 'आप'ने काँग्रेसचे नुकसान केले होते. मतविभागणी टाळायची असेल तर काँग्रेस व 'आप'ला गुजरातमध्ये तडजोड करावी लागेल. इथे काँग्रेसने सामंजस्याची भूमिका घेतली तर 'आप'ही दिल्लीत काँग्रेसला सातपैकी दोन वा तीन जागा देऊ शकतो. तसे झाले तर गुजरात व दिल्ली या दोन्ही राज्यांमध्ये भाजपला तगडे आव्हान देता येऊ शकते. पंजाबमध्ये हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधातच लढतील. दक्षिणेत केरळ व पश्चिम बंगालमध्ये 'इंडिया'तील घटक पक्षांमध्ये आघाडी होणार नाही. केरळमध्ये काँग्रेस व माकप एकमेकांविरोधात लढतील. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस व माकप-काँग्रेस एकमेकांविरोधात लढतील. काही जागांवर छुपी युती होऊ शकते. तमिळनाडूमध्ये द्रमुक-काँग्रेस युती आहेच. कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशमध्ये 'इंडिया'तील फक्त काँग्रेसचे अस्तित्व आहे. झारखंडमध्ये काँग्रेस व झारखंड मुक्ती मोर्चामध्ये जागावाटप होऊ शकते. या सगळ्या राज्यांमध्ये काँग्रेसने जागावाटपाची बोलणी सुरू केली आहेत किंवा तडजोडीची तयारी दाखवलेली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्मचळवळ आणि समाज चालला कुठे?


धम्मचक्र प्रवर्तन दिनाला ६७ वर्ष पूर्ण होत असताना.त्यांनी दिलेले धम्म आज ही  समाजात पूर्ण रुजला नसल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. त्यामुळे आम्ही खूप पुढे गेलो असे म्हणता येत नाही.आणि खूप मागे हि राहलो असे म्हणता येत नाही.बाबासाहेबाचा पुतळा, चबुतरा असलेल्या चौकात निळी दही हंडी आणि बुद्ध विहारा समोर गणपती,नवरात्र उत्सव आता उघडपणे मोठ्या उत्सवात साजरा होते. मातृसंस्थाचे प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक बौद्धाचार्य गुरुजी,पदाधिकारी आणि धम्म उपासक उपाशिका हताश पणे पाहतात.स्थानिक राजकीय कार्यकर्ते सर्वधर्मसमभावच्या राजकीय मंत्राचा मना पासून आदर करण्याचा आव आणतात.त्यामुळे आम्ही बुद्ध आणि त्याचा धम्म हा बाबासाहेबांनी लिहलेला महान ग्रंथ घराघरात वाचून ही त्याचे आचरण मात्र कुठे होताना दिसत नाही. त्यामुळे संपूर्ण समाज व आंबेडकरी चळवळ दिशा हीन झाली आहे.कोणाचे कोणाला दडपण भिती राहिली नाही.



डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी असंघटीत अशिक्षित शोषित अस्पुष्य समाजाच्या यातना आणि वेदना स्वता भोगल्या.आपण उच्च विद्याविभूषित झाल्या नंतर ही चातुर्वण्य मानणाऱ्या चौकटीच्या समाज व्यवस्थेत आपल्याला माणूस म्हणून माणुसकीची व समानतेची वागणूक मिळत नाही.तर माझ्या गोरगरीब असंघटीत असुशिक्षित शोषित समाजाची काय अवस्था असेल.या चिंतेने ते सतत तळमळत.यामुळेच त्यांच्यातील विचारवंताने या समाजाच्या गुलामीच्या बेड्या तोडण्याचे व्रत हातात घेऊन क्रांतीची मशाल पेटविण्यासाठी जीवनभर संघर्ष केला आणि समाजाचे प्रबोधन करून समाज संघटीत केला.

इंग्लंड,अमेरिका,रशिया,या सारख्या देशातून उच्च विद्याविभूषित होऊन कायदे पंडित झालेला हा विद्वान समाजाच्या न्याय,हक्क,व प्रतिष्ठेसाठी रस्तावर उतरून सतत संघर्ष करीत राहिला.आणि त्याच्या संघर्षाला कायद्याचा सनदशीर मार्गाचा आधार होता.त्यांनी वैचारिक अधिष्ठान असलेला युक्तिवाद,संघटना,व राजकीय दबाव याचा समाजा करिता एक हत्यार म्हणून वापर केला.पण त्यांनी कधी ही बेकायदेशीर कारवाया अथवा हिंसाचाराचा कधी अंगीकार केला नाही.कारण बळाचा वापर न करता त्यांनी बुद्धिचातुर्य वापरून सामाजिक क्रांतीचे ध्येय गाठले.आजचे नेते एका आमदार,खासदारकी साठी समाजाला वैचारिक शत्रूशी युती आघाडी करतात.

त्याकाळी हिंदू धर्माच्या चातुर्वण्य व्यवस्थेमुळे शोषित समाज मानसिक दृष्ट्या पंगु बनला होता.उच्चवर्णीयनी देव,धर्म व धर्मशास्त्राच्या जोखंडत त्याला भोला भक्त (अंधश्रदा) बनवून माणुसकी शून्य पशुपेक्षा ही हीन-दिन अस गुलामीच जीवन जगणे भाग पडल्या जात होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी हिंदू धर्मात सुधारणा करण्याच्या जिवापार प्रयत्न केला. मनुस्मुर्ती जाळली,महाडच्या चवदार तळ्याचा संघर्ष म्हणजे पाण्याला आग लावली,नाशिक काळाराम मंदिर प्रवेश महणजे देवाला त्याच्या भक्ताला सुबुद्धी देण्याचे जाहीर आव्हान. चातुर्वण्य समाज व्यवसस्थेवर घणाघाती घाव घातले,पण जेव्हा काहीच हाती लागत नाही हे लक्ष्यात आले तेव्हा बाबासाहेबांनी १९३५ ला येवले येथे धर्मातराची घोषण आणि प्रतिज्ञा केली. अस्पुश्य शोषित समाजाला स्वाभिमान व माणुसकी मिळवून देऊन त्याच्यात क्रांतिकारी बदल घडवून नवसमाज निर्माण करून दाखविणार.आणि आज खरेच अस्पृश शोषित समाजात जास्तीच बद्दल झाला. त्याकाळी त्याला सर्वधर्मसमभावचा अर्थ समजत नव्हता त्यावेळी त्याची बुद्धी शेण खात होती.आज सर्व आंबेडकरी विचारांच्या समाज वस्त्यातील बाल्लेकील्यात शेणखत काढून पोट भरणारयाची पोर खेड्यातून शहरात आले आणि स्वभिमानी झाले.विविध पक्षाचे घाणीतील कार्यकर्ते म्हणून ओळखळ्या जातात. त्याचे ऐतिहासिक काम हेच कि बाबासाहेबाच्या सर्व संस्था,संघटना,पक्षात फुट पडून वाटोळे करणे.



माणसाच्या जीवनात धर्माची गरज आहे.माणसाचे मन सुसंस्कृत होण्याकरिता त्याला धर्माची आवश्यकता असते.यावर बाबासाहेबाची श्रद्धा होती.ते स्वत: अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते.म्हणून त्यांना धर्माची आवश्यकता वाटत होती.त्यामुळेच त्यांनी सर्व धर्माचा मनलावून अभ्यास केला.नुसते वाचले नाही.(जसे आज आम्ही बुद्ध आणि त्याचा धम्म वाचतो.) त्यानंतर त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला म्हणजे हिंदुच्या विजया दशमीला धर्मातर करून देशात नव्हे तर जगात रक्तहीन सामाजिक धार्मिक क्रांती केली.आणि १९३५ ला केलेली प्रतिज्ञा पूर्ण केली.धर्म आणि धम्म यातील ठळक फरक या देशातील चातुर्वण्य समाज व्यवस्था मानणाऱ्या ढोगी लोकांना दाखवून दिला.धर्म म्हणजे निव्वळ वर्तुनुकीचे व सामाजिक आचरणाचे नियम नव्हे तर नितीमता हे धर्माचे अधिष्ठान असले पाहिजे.धर्माने दारिद्र्याचे गोडवे गाऊ नव्हे.ईश्वराने काही लोकांना केवळ दारिद्र्यात व सर्व प्रकारच्या सुखसोई पासून वंचित राहण्यासाठी जन्माला घातले या उलट इतरांना केवळ गर्भश्रीमंतीत लोळुन आणि विशेषाधिकार वापरून गरिबांवर अधिराज्य गाजविण्यासाठी जन्मा घातले आणि घडविले अशी शिकवण कोणत्याही धर्माने देऊ नये.तर इतरांशी ते आपले बंधू आणि भगिनी आहेत असे समजून वागण्यासाठी श्रध्दा भिन्नभिन असल्या तरी प्रत्येकांने एकमेकाशी केवळ एक मनुष्य मात्र म्हणून वागावे.या साठी धर्माने आपल्या भक्तांना अनुयायांना उतेजन दिले पाहिजे जे धर्म माणसाला माणसा सारखे वागविण्याची शिकवण देत नाही तो कसला धर्म ?.या सर्व कसोट्यांवर परिपूर्ण उतरेलेला जगातील एकमेव धर्म म्हणजे बुद्ध धर्म (धम्म) आहे.याची पूर्ण खात्री बाबासाहेबांना झाली म्हणून त्यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला,आता त्याचे नांव घेणारे अनुयायी त्या त्यागाला परिश्रमाला राजकीय फायद्या करिता सर्वधर्मसमभाव ची फोडणी देण्याचा केविलवाना प्रत्यन करीत आहेत.

बुद्धाचा धम्म मानवतावादी,विज्ञानवादी असून तो याच जीवनात प्रत्यक्ष अनुभव घेण्यावर व आचरणावर भर देणारा आहे.मैत्री,करुणा व शांततेवर जोर देतो.जीवना विषयीचे स्पष्ट आणि रास्त स्पष्टीकरण देऊन सुरवात आणि शेवटही मनुष्यमात्राच्या कल्याणाचाच विचार करतो.शिल,सदाचाराची शिकवण देतो.या धर्मात धम्मात ईश्वराला,काल्पनिकतेला, कर्मकांड,व थोतांडाला अजिबात थारा नसून तो वास्तववादी व परिवर्तनशील आहे.त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी बुद्ध धम्माची दिक्षा घेतली. त्याचे महत्व चळवळ आणि समाज यात कमी दिसते.उच्च शिक्षित सुरक्षित नोकरी करून सुरक्षित ठिकाणी राहणारे घरात गणपती बसवून आमचा सुख कर्ता असल्याचे बेशरमपणे सांगतात.शिक्षणात नोकरीत आरक्षणाची सवलत कोणामुळे मिळाली हे ते विसरतात.माझ्या सारख्याने विरोध केला तर पत्नी दुसऱ्या जातीची आहे,किंवा हाय सोसायटी मध्ये राहत असल्यामुळे मुलांच्या इच्छाखातर करावे लागते असे बिनडोकपणे उत्तरे देतात.जात लपवून लग्न करणे सोपी आहे.पण घरत कोणाचा मृत्यू झाल्या नंतर जात लपविता येत नाही.अशी एक नाही हजारो उदाहरणे आजच्या घडीला शहरात घडतांना दिसत आहेत.रोखण्यास संस्था संघटना कुठे तरी कमी पडतात.म्हणूनच आम्ही ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाला आत्मपरीक्षण करतांना किती पुढे गेले आणि किती मागे राहिलो हे सांगता येत नाही. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्म चळवळ आणि समाज चालला कुठे ?.याचे गांभीर्याने विचार झाला पाहिजे. हीच सर्व आंबेडकरी विचारांच्या धम्म उपासक उपासिका कडून अपेक्ष करतो..या निमित्याने सर्वांना हार्दिक मंगल कामना. सर्वांचे मंगल हो!.



सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,भांडूप,
मुंबई.धम्म प्रचारक,अभ्यासक

# धर्मांतरनाने काय दिले...?

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अशोक विजया दशमी या दिवशी लाखों अनुयायां सोबत धम्मदिक्षा घेऊन आज करोडो लोकांना धम्माचा मार्ग दिला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना धर्मांतर का करावे लागेल? आणि धर्मांतरनाने काय दिले याचे उत्तर शोधले तर बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या धर्मांतरनाने सामाजिक, वैचारिक व आर्थिक क्रांतीच झाली हेच निष्पन्न होते. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतरनाचा निर्णय घेतला कारण तेथे जातीभेदाचे, अस्पृश्यतेचे मुळ खोलवर पोहचले होते. अंधविश्वास व पाखंड यामुळे मानसाला मानसिक गुलाम बनवून हक्क अधिकार व विकासाची दारे बंद करून विषमतेच्या नावाखाली प्रत्येक मानसाचे शोषण होत होते. एकच वर्ण बहुसंख्य लोकांचे शोषण करून स्वतः चे पोषण करत होता. सर्व सत्ता, संपत्ती आणि वर्चस्व एकाच वर्णाचे राहावे म्हणून इतरांना हिन लेखणारी निच माणसिकतेच्या लोकांनी सामाजिक वातावरण दुषीत करून माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते. कुत्र्याला मिरण्याचा थाट व माणसाला माणसाचा बाट अशी एकदम खालच्या स्थराला धर्ममार्तंड लोकांची मानसिकता पोहचली होती. ही मानसिकता समता बंधुता, न्याय व स्वातंत्र्य नाकारणारी होती. माणसाला प्रगती करायची असेल तर समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य दिले तरच तो सर्व क्षेत्रात प्रगती होऊ शकते आणि मुळात हेच धर्मात नाकारले होते. जातीव्यवस्था मजबूत असल्याने माणासाला स्वतंत्र अशी ओळख नव्हती. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतरनाचा निर्णय घेऊन लोकांना मानसिक स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय, अस्तित्व व स्वाभिमान याची जाणीव करून तर दिली हा तर जागतिक इतिहास आहेच. परंतु अजून सर्वात मोठा अमुलाग्र बदल म्हणजे धर्मांतरीत लोकांमध्ये वैचारिकता वाढीला लागली. धर्मांतरीत लोक राष्ट्र हित, भारताचे संविधान, सामाजिक समस्या व त्या सोडविण्यासाठी समोर यायला लागले, सामाजिक न्यायासाठी रस्त्यावर यायला लागले. अंधविश्वास व पाखंड बाजूला सारून भोंदुगीरी चे व भक्तीच्या नावाखाली मध्यस्थी चे वर्चस्व कमी झाले. दैववादी विचारसरणी बदलून कर्मवादी व विज्ञानवादाची बनले. या सर्व बदलामुळे धर्मांतरीत लाखो लोकांना स्वतः च्या अस्तित्वा बरोबरच मान सन्मान ही मिळायला लागला. जातीव्यवस्थे मध्ये ज्यांना सर्व हक्क अधिकार नाकारले होते तेच लोक धर्मांतरनामुळे देशाचे सामाजिक व राजकीय नेतृत्व करायला लागले. बुद्ध धम्माची दिक्षा देऊन बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी करोडो लोकांच्या डोक्यातील अंधविश्वास, पाखंड, बाजूला



काढून त्यांना शिक्षण व विज्ञानाचा मार्ग दिला. अंधविश्वास, पाखंड, होम-हवन, पुजा अर्चा यांच्या नावाखाली होणारी आर्थिक पिळवणूक थांबून तोच पैसा शिक्षण, आरोग्य यावर खर्च व्हायला सुरुवात झाली. शिक्षणाने मस्तक सुधारते व सुधारलेले मस्तक सर्वांना जागृत करते. आज बुद्ध धम्मीय लोक सामाजिक समता, न्याय, बंधुता, भारतीय संविधान यावर बोलुन मानसाच्या विकासाचे मत मांडतात परंतु आजही देशात एवढी जातीयता आहे की त्यावेळी सर्वात विद्वान असलेले, भारतीय संविधानाचे शिल्पकार असलेले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य केवळ जातीमुळे दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. यावरून आजही गुणवत्ता, चांगले काम, विद्वता यांना काहीच महत्त्व देत नाही तर महत्व दिले जाते जाती धर्माच्या नावाखाली लोकांचे शोषण करणाऱ्यांना, महत्त्व दिले जाते भोंदुगीरी करणाऱ्यांना, महत्त्व दिले जाते जादु टोणा करून राख देणाऱ्यांना, कारण धर्मात राहून आजही विषमतेचे विचार बाजूला गेले नाहीत. उलट विषमता आजही खोलवर आहे फक्त प्रत्यक्ष दिसत नाही. उलटपक्षी बौद्ध धम्मीय लोक बघितले तर जे सत्य आहे, ज्या लोकांनी माणसाच्या कल्याणासाठी काम केले त्या सर्व महापुरुष व संताना आपल्या प्रेरणास्थानी माणतात, माणसाच्या कल्याणासाठी ज्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या संत महापुरुषांच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार करतात. कोणत्याही जातीवर अन्याय झाला तरी बौद्ध धम्मीय लोक न्यायाच्या बाजूने उभे राहतात. आजही हिंदु धर्मातील अनेक जातीवर अन्याय अत्याचार हिंदु धर्मीय लोकांकडून च होतो. परंतु अशा पिडीत लोकांच्या न्यायासाठी बौध्द धम्मीय लोक रस्त्यावर उतरतात, आंदोलन करतात, व बाजु उचलून धरतात. हा मनाचा मोठेपणा व सामाजिक न्यायाची भावना केवळ धर्मांतर केल्यामुळे निर्माण झाली आहे. अंधविश्वास, पाखंड, थोतांड यावरचा खर्च कमी होऊन आणि भक्तीच्या नावाखाली मध्यस्थी करणाऱ्याची दुकानदारी बंद करण्याचे क्रांतिकारी काम बौद्ध धम्मीय लोकांनी केले. बौद्ध धम्मीय लोकांच्या घरात अंगारा, धुप, व अंधविश्वास पसरवणारे साधने न दिसता पुस्तकाचे कपाट मात्र नक्कीच दिसते. बौद्ध धम्मीय लोकांच्या घरात पुस्तकाचे भंडार आहे. ज्याला शिक्षण, वाचण आणि पुस्तक याचे महत्त्व कळत नाही त्यांना पुस्तकाचे महत्त्व कळणारच नाही परंतु जागृती, विज्ञानवाद आणि सामाजिक विषय जेथे येतील तेथे बौद्ध धम्मीय लोक आघाडीवर आहेत यामध्ये कुठेही शंका नाही. हजारो वर्षांपासून डोक्यात अंधविश्वास,पाखंड,भोंदुगीरी पेरली गेली ती एकाच धर्मांतरनाने एकदम दुर गेली. आजही काही लोकांच्या मनामध्ये भोंदुगीरी, अंधविश्वास आहे तोही निघून जाईल परंतु आपण तुलना केली तर बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार रोज होत नाही, पण अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी विषयी सकाळी उठल्यापासून तर झोपेपर्यंत लोकांच्या डोक्यात टाकले जाते, म्हणून काही लोक अंधविश्वासाकडे वळलेले आहेत हे नाकारता येत नाही परंतु प्रमाण जर बघितले तर आज देशाला तर्क, विज्ञान आणि विचार फक्त आणि फक्त बौद्ध धम्मच देऊ शकतो हे कोणीच नाकारू शकत नाही. बौद्ध धम्मीय लोक नियमित पणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करत नाही तरीही हा अमुलाग्र बदल केवळ आणि केवळ पुस्तकांमुळे व शिक्षणामुळे झाला. आज ज्या ठिकाणी बौद्ध लोक जातात त्या ठिकाणी पुस्तकाची विक्री करोडो रुपयाची होते. जेव्हा जेव्हा राष्ट्र हित, महिलांचा प्रश्न, शिक्षण, आरक्षण, संविधान आणि धार्मिक प्रश्न उपस्थित केले जातात तेव्हा बौद्ध धम्मीय लोक सत्य व न्यायाची बाजू घेऊन आंदोलन मजबूत करतात. परंतु ज्यांच्या डोक्यात विषमता आजही कायम आहे, ज्यांना आजही थोतांड आणि काल्पनिक गोष्टी खऱ्या वाटतात त्यांना सत्य आणि न्यायाची बाजु कशी पचेल हाच सर्वात मोठा प्रश्न आहे. धर्मांतरनाने एक वैचारिक फळी तयार होऊन प्रबोधनाची सुरवात झाली आहे. धर्मांतरनामुळे अस्तीत्व व स्वाभिमान निर्माण झाल्याने बौद्ध धम्मीय लोकांकडे स्वतः च्या मालकीच्या शाळा, कॉलेज, बँका, व इतरही आर्थिक उत्पन्नाचे स्वतः चे स्त्रोत तयार झाले आहेत. वैचारिक पातळी वाढल्यामुळे अनेक ठिकाणी बौद्ध धम्मीय लोकांना मार्गदर्शक म्हणून सुद्धा नेमणूक झालेल्या आहेत. अनेक वैचारीक, बौद्धिक क्षेत्रात अध्यक्ष पदही बौद्धांकडे द्यावे लागले. आज बौद्ध जरी उच्चारला तर भोंदुगीरी करणारा, महिलांची दिशाभूल करून दानाच्या नावाखाली आर्थिक पिळवणूक करणारे लोक दुर पळतात. भविष्य पाहणारे, जन्मकुंडली तयार करणारे बौद्ध वस्तीत जाणे जाणीव पुर्वक टाळतात याचाच अर्थ आज बौध्द लोक जागृत होऊन अंधविश्वास मानत नाहीत व जन्म कुंडली आणि भविष्याचा यांच्या वर काहीच परिणाम होत नाही हेच सिद्ध. अंधविश्वास बाळगून मानसिक गुलाम होऊन दैववादी होऊन आपल्याच प्रगतीला बंधने घातल्या पेक्षा अंधविश्वास झुगारून विज्ञानवादी व कर्मवादी होऊन स्वतः चे भविष्य स्वतः घडणारेच नेतृत्व करत असतात आणि हिच शिकवण धर्मांतरनाने दिली. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतरनाची दखल संपूर्ण जगाने घेतली कारण सर्वात विद्वान व्यक्तीने स्वतः साठी नव्हे तर समाजाच्या कल्याणासाठी केलेले धर्मांतर ही बाब जागतिक प्रेरणादायी ठरली. आणि ठिकाणाहुन प्रेरणा घेऊन आज करोडो लोकांमध्ये वैचारिक, सामाजिक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय बदल झाले हेच तर धर्मांतरनाने दिले.. धर्मांतरना कडे जर जनहित लक्षात घेऊन बघितले असते तर आज भारत जगात महाशक्ती म्हणून उदयास आला असता परंतु एवढ्या मोठ्या क्रांतीलाही जातीचे स्वरूप दिले म्हणून एका जातीचे लोक धर्मांतरीत झाले परंतु नेतृत्व आजही देशाचे करत आहेत म्हणूनच तर धर्मांतर बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि आज उद्देश्यही पुर्ण झालेला दिसत आहे. धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या समस्त भारतीयांना मंगलमय सदिच्छा..

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# दिक्षाभूमीवर भक्तांच्या गर्दीत क्रांतिकारी विचारांची हत्या?

सम्राट अशोक धम्म विजया दिन म्हणजेच धम्मचक्र प्रवर्तन दिन हा जगाच्या नकाशावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्म दीक्षा सोहळयाचा ऐतिहासिक इतिहास नोंदविला गेला आहे.तो दरवषी विजया दशमीला नागपुरात मोठ्या उत्साहात साजरा होतो.देशात असा कोणताही नेता व संघटना,पक्ष नाही की त्याला हजार दोन हजार लोक गोळा करण्यासाठी हंड्बील,पोस्टर,जाहिराती देऊन मिटींगा घ्याव्या लागतात तेव्हा मोठ्या मुश्किलीने लोक गोळा होतात.त्यांना वाहनाची,चहा,पाणी आणि जेवणाची व्यवस्था करावी लागते. देशात नव्हे तर जगात एकच व्यक्ती अशी आहे कि त्याच्या प्रतिमेला त्यांच्या कार्याला वंदन करण्यासाठी,सलामी देऊन नतमस्तक होण्यासाठी नागपुरात गेल्या ६७ वर्ष लाखोच्या संख्ये लोक येतात.त्यासाठी त्यांना कोणताच नेता हंड्बील पोस्टर कडून येण्याचे आमंत्रण निमंत्रण देणारे आवाहन करीत नाही तरी लोक लाखोच्या संख्येने येतात.त्या लाखो लोकांचे नेतृत्व कोणीच करीत नाही. सर्वच स्व्यमघोषित नेते कार्यकर्ते असतात.

१ जानेवारी शौर्य दिन भिमा कोरेगांव,अशोक विजया दशमी नागपूर,२० मार्च चवदार तळे महाड आणि ६ डिसेंबर चैत्यभूमी दादर मुंबई येथे येणारी गर्दी कोणाच्याही नियंत्रणात नसल्यामुळे सरकारला खूप काळजी पूर्वक परिस्थिती हाताळावी लागते. त्यामुळेच प्रशासन अधिकारी दरवर्षी लोकांना जास्तीत जास्त त्रास कसा होईल यांचेच नियोजन करीत असतात.रोड बंद,पार्किंग बंद,जाणूनबुजून या असंघटीत समाजाला त्रास देण्यासाठी किंवा जातीय दंगल घडविण्यासाठी अनेक षड्यंत्र केली जातात. त्यातच घरका मुदयी लंका ढाये,कपटी मित्रा पेक्षा दिलदार शत्रू बारा.दरवर्षी मान्यताप्राप्त नेत्यांच्या विरोधात समाजात असंतोष निर्माण करून शॉटकट नेते बनणारे काही कमी नाहीत.सम्राट अशोक धम्म विजय दिनाच्या पूर्व स्नाध्येला अनेका विषयी नको ते शब्द व्यक्त करून शब्द स्पोट घडविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे नेहमी सारखा नागपुरांच्या दिक्षाभूमी वर भक्तांच्या गर्दीत क्रांतिकारी विचारांची हत्या?.ही होणारच असे ठरलेले असते.

मागासवर्गीय समाजातील भक्त मंडळी महापुरुषांचे जन्मदिन आणि स्मृतीदिन आल्यावर भरभरुन अभिवादन करायला लागतात. मी पण १९८२ पासून १९९४ पर्यत नागपूर,मुंबई बुक स्टोल लावून पुस्तके विकत होतो.दादरच्या शिवाजी पार्क मध्ये चष्मा तपासणी शिबीर,आरोग्य तपासणी शिबीर,जनजागृती साठी पत्रक वाटप असे काम दरवर्षी करत होतो.कालकथीत विजय गोविंद सातपुते यांच्यामुळे कॉम्रेड शरद पाटील यांच्या संपर्कात आल्यानंतर खरी परीस्थिती आणि मूळ समस्या व त्या समस्यांचे मूळ कारण लक्षात येऊन त्या दृष्टीकोणातून फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीची क्रांतिकारी विचारांची खरी ओळख पटू लागली. मग हे एक दिवसाचे भावनिकदृष्ट्या दाखवल्या जाणारे प्रेम, अभिवादन,त्रिवार वंदन ह्या गोष्टी बनावटी वाटून चीड निर्माण करु लागल्या.कारण ह्यामुळे महापुरुषांना अपेक्षित बदल होणं तर दूर उलट त्यांच्या विचारधारेचा पराभव होऊन त्यांच्याच समतावादी विचारांची हत्या होऊन विषमतावादी विचारधारेचा विजय होतांना दिसत आहे.नागपूरच्या दिक्षाभूमी वर होणाऱ्या प्रत्येक कार्यकमात आर एस एस प्रणित नेत्यांचे उपस्थिती आणि आदरतिथ त्यातून राज्यात देशात जाणारा संदेश हा भक्तांच्या गर्दीत क्रांतिकारी विचारांची हत्या? करणारा आहे.नव्हे असतोच.



मेरा जीवन ही मेरा संदेश है! हे शंभर टक्के सत्य असतांना त्यांच्या नावाचा जयजयकार करण्यावर भर दिला जात आहे. आपल्या प्राणांची बाजी लावून माझे अपूर्ण कार्य पूर्ण करा. जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा. असे सांगणाऱ्या बाबासाहेबांच्या आयुष्याचा खराखूरा अभ्यास केलात तर जाणवते,त्यांनी त्यांच्या जीवनात मानलेले तीन गुरु बुद्ध–कबीर– फुले यांचा जयजयकार न करता त्यांच्या विचारांचे आयुष्यभर अनुकरण करत त्यांचे सामाजिक कार्य पूर्णत्वास नेले.ही कोणत्या ही अनुयायाने आपल्या महापुरुषाला दिलेली खरी व प्रामाणिक प्रेरणादायी मान वंदना,श्रद्धांजली किंवा आदरांजली असते. बाकी सगळं प्रचंड ढोंग असते व स्वताचा स्वार्थ संभाळत केलेली तडजोड असते.खरे प्रबोधन व अनुकरण समजून घेण्यासाठी बाबासाहेबांच्या सामाजिक गुरुंच्या आयुष्यातले अनेक महत्वपूण प्रसंग वाचले तर प्रेरणा देतात. बाबासाहेबांनी आम्हा पाच्यांशी टक्के बहुजनांना संख्यावार प्रतिनिधीत्व व मानवी हक्क–अधिकार देण्यासाठी मनुस्मृती विरोधात लोकशाही व संविधान भारतात आणण्यासाठी वेळप्रसंगी स्वताची पत्नी व मुले,सुखसोई त्यागून आयुष्यभर जनजागृती,समाजप्रबोधन,संघटीत जात दांडगे धनदांडग्याच्या विरोधात असंघटीतांना संघटीत करून अभ्यास करून संघर्ष केला. आज दिसणारा साधन–संपन्न एस सी,एस टी,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाज निर्माण केले.अन्यता शुद्र, अतिशूद्र आणि अस्पृश समाज माणूस मानून जगण्याच्या लायकीचा सुद्धा नव्हता. तो समाज आता लोकशाही व संविधान कमकूवत करत असलेल्या ब्राम्हणशाहीची वाढती गर्वसे कहो हम हिंदू है ही गुलामी पत्कारून बहुजन समाजातील महापुरुषांच्या क्रांतिकारी विचारांना पराभूत करून भक्तांच्या गर्दीत क्रांतिकारी विचारांची हत्या?. करीत नाही काय?.

महापरीनिर्वाण दिनाला,शौर्य दिनाला,धम्मचक्र अशोका विजया दशमी दिनाला दिसणारी भक्तांची गर्दी निवडणूकीत कोणत्या ही मतदारसंघात संख्येच्या बळावर खरी का उतरत नाही.यांचे चिंतन कोणता ही नेता कार्यकर्ता करतांना का दिसत नाही.म्हणजेच ही वेगवेगळ्या दिनाला दिसणारी भक्तांची गर्दी भक्तांच्या गर्दीत क्रांतिकारी विचारांची हत्या?.करणारी आहे.हे सिद्ध होते.यावर वैचारिक विचारमंथन झाले पाहिजे.चर्चा,संवाद परिसंवाद होऊन योग्य मार्ग काढला पाहिजे.अन्यता असे दिन येत राहतील आणि गर्दी वाढत जाईल.

**सागर रामभाऊ तायडे**
**भांडूप,मुंबई.**

# भगवान बुध्दाचा धम्म मानवतेकडे

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून या मधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. डॉ. बाबासाहेबांनी सर्वार्थाने आपला मानला तो अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, तत्वज्ञ–आदिम, साम्यवादी गणसंस्थेशी जीवंत नाते सांगणारा शाक्य गौतम, करुणाघन, मध्यममार्गी, समतावादी, विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतीकारी महामानव म्हणजेच धर्म संस्थापक महात्मा तथागत भगवान गौतम बुध्द !

सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये. तद्प्रसंगी सिध्दार्थाने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीर्याने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्यासाठी स्नान एक साधन असते. फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दु:ख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न–वस्त्र–निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळविलेल्या ज्ञान चितंनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवन मार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सर्वागीण विकास घडविण्यास मदत होते. हा संदेश संपुर्ण विश्वाला तथागताने दिला.

व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे–ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित–ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षण ज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासच राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने. भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्या प्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित झालेले होतेच. परंतू त्याही पेक्षा किती तरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते.



दलित तरुण (आंबेडकरवादी) हा अधिक पुरोगामी व विज्ञाननिष्ठ बनतो आहे, याचे कारण धर्मांतर आहे. याला राजकिय स्वार्थासाठी गेली ४० वर्षे जाति–धर्माच्या जाळयात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरीही बंधने झुगारुन देणारी वृत्ती दलित तरुणांमध्ये वेगाने वाढत आहे. याला साक्ष म्हणजे १९७२ नंतरची केवळ दलित तरुणांची आंदोलने आहेत.

भगवान बुध्दांच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दीवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मान पुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दीवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त–दिपो–भव, अत्त–विरहत, अत्त–सरणा अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुस–या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

लॉकडाऊनच्या काळात ज्यांचे हातावरील पोट आहेत, अशा गरजू लोकांच्या भोजनाची व्यवस्था करतांना अनेक लोक किंवा संस्था दिसत होत्या. अनेक लोक अडचणीत सापडले असतांना, त्यांना सर्व प्रकारची मदत करतांना दिसत होते. ही मदत करतांना कुणीही जात, धर्म विचारला नाही, फक्त माणूसकी धर्म पाळत होते. धार्मिक श्रध्दा व विश्वास हा मिथ्या आहे, विज्ञान व मानवतावाद आणि माणूसकी सत्य आहे हेच सिध्द होते. म्हणूनच माणसाने माणसाशी कसे वागावे याचा आदर्श घालून देणारा बुध्दांचा धम्म श्रेष्ठ आहे आणि तोच जगात शिल्लक राहील.

बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहा सारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द–बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध् करुन दिला आहे. मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द–धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. ६७ व्या धम्मक्रांतीच्या समस्त जनतेला मन:पूर्वक शुभेच्छा !



प्रविण बागडे
नागपूर – १४
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई–मेल : ींर्रीळपलरसवशसारळश्र.लो

# जिल्हाधिकारी कार्यालय होणार ऊर्जा कार्यक्षम इमारत



लातूर (जिमाअ) : वीजेची वाढती मागणी, वीज निर्मितीचा वाढता खर्च, वीज निर्मितीसाठी लागणारे इंधन, त्यातून निर्माण होणारा पर्यावरण ऱ्हास या सगळ्या गोष्टीचा विचार केला तर आपण वापरतो ती वीज किती मौल्यवान आहे हे लक्षात येईल. आता ऊर्जा संवर्धन साक्षरता अत्यंत गरजेची आहे, हे लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात ऊर्जा संवर्धानाचे पहिले पाऊल म्हणून वीज बचत चळवळ माझ्या कार्यालयापासूनच सुरु करणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांनी आज सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व अधिकाऱ्यांना ऊर्जा संवर्धनाचे महत्व समजावे म्हणून आज ऊर्जा विभाग, भारत सरकार प्रमाणित ऑडिटर केदार खामितकर यांचे सादरीकरण ठेवले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनील यादव यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाल्या, ऊर्जा संवर्धनाची सुरुवात आपल्या पासून करू या. अगोदर सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कार्यालयात अत्यंत कमी ऊर्जा वापरायला सुरुवात करायची आहे. आता ही सवय लावून घ्यायची गरजे पूरतीच वीज वापरायची. घरी आपण जसे अधिक लाईट बिल येईल म्हणून लाईटचे बटन बंद करतो तीच सवय कार्यालयात लावून घ्यायची. थोड्या दिवसातच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागातील कार्यालयातील विद्युत दिवे आणि विद्युत उपकरण स्वयंचलीत केली जाणार असून व्यक्ती नसेल तर ऍटोमॅटिक हे सगळे बंद राहिल, अशी व्यवस्था निर्माण केली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या घरीही अपारंपरिक ऊर्जा वापरायला सुरुवात करावी. जिल्ह्यात जनतेला सांगताना तो नैतिक अधिकार प्राप्त करायचा असेल तर हे करावचं लागेल. आता ही गोष्ट चळवळ म्हणून करावी लागेल तरच आपण ऊर्जा संवर्धन करू असेही जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. सध्या आपण जी वीज वापरतो ती कोणकोणत्या इंधनाचा उपयोग करून निर्माण केली जाते. त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम, आपण वापरत असलेले इंधन पेट्रोल, डिझेल, दगडी कोळसा हे एक ना एक दिवस संपणार आहेत. त्याला पर्याय निर्माण होत आहेत. पण वीज वापरताना आपण ती अत्यंत निष्काळजीपणाने वापरतो. हे राष्ट्रीय नुकसान आहे. त्यामुळे ऊर्जा संवर्धन हे स्वहितासाठी व राष्ट्रहितासाठी करू या असा सल्ला एनर्जी ऑडीटर केदार खामितकर यांनी आज सर्व अधिकाऱ्यांना दिला. ऊर्जा वापरताना कशी संवर्धन करता येईल याबद्दलही त्यांनी सविस्तर सांगितले.

# एक वर्षा पासून बेपत्ता असलेल्या आणखीन ०३ मुलींना शोधण्यात यश.








लातूर :– एक वर्षा पासून बेपत्ता असलेल्या आणखीन ०३ मुलींना शोधण्यात यश. –क्ढ्ढण ची ऑपरेशन मुस्कान अंतर्गत कारवाई. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, सन २०२३ मध्ये पोलीस ठाणे भादा, विवेकानंद व गांधीचौक येथे अल्पवयीन मुलींचा अपहरण झाल्याच्या तक्रारीवरून भादवि कलम ३६३ प्रमाणे अनुक्रमे तीन अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. गुन्हे दाखल झाल्यापासून संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस नमूद मुलींचा शोध घेत होते परंतु त्या मिळून येत नव्हत्या.

पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी बऱ्याच कालावधीपासून तपासावर असलेले, आतापर्यंत मिळून न आलेल्या मुला–मुलींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला (–क्ढ्ढण) आदेशित करून सूचना व मार्गदर्शन करून ऑपरेशन मुस्कान राबविण्यास सांगितले होते.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख व पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी हे त्यांच्या पथकामार्फत ऑपरेशन मुस्कान अंतर्गत वरील गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते.

सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना अपहरण झालेल्या मुलीचा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जाऊन शोध घेतला तसेच सायबर सेलच्या मदतीने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून मिळालेल्या माहितीवरून माळशिरस, सोलापूर, धाराशिव, तुळजापूर व राज्याच्या सीमालगत गावात सदर मुलींचा शोध घेऊन त्यांच्यासोबत असलेल्या इसमासह पोलिस ठाणे भादा , विवेकानंद व गांधी चौक येथे हजर करण्यात आले आहे. पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत. ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे महिला पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोहेका योगी, मापोना सुदामती वंगे, गिरी,चालक बुढे तसेच सायबर सेल यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

काय आहे ऑपरेशन मुस्कान ?

या मोहिमे अंतर्गत हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेतला जातो. बेपत्ता व्यक्ती त्यांच्या घरच्यांना पुन्हा सूपूर्द केल्या जातात. ऑपरेशन मुस्कान म्हणजे ज्या घरातून लोक बेपत्ता झाली आहेत. त्या घरातल्या लोकांच्या चेहऱ्यावर हसू पुन्हा आणण्यास मदत करणे. ही मोहीम महाराष्ट्र पोलिसांनी सर्वात पहिल्यांदा २०१४ मध्ये राबवली होती.

लातूर पोलीस दलात १ मार्च २०२२ पासून कार्यान्वित झालेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (–क्ढ्ढण) कडून आज पर्यंत १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या २७ मुलींना शोधून त्यांना त्यांच्या नातेवाईकांना सूपूर्द केलं आहे.

# मानवी जीवनात माणुसकीचा धर्म सर्वश्रेष्ठ भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो

## वैशाली बुद्ध विहारात अखिल भारतीय भिक्खू संघाच्या कार्याध्यक्षपदी भंदत डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या निवडीबद्दल सत्कार व धम्मदेसना कार्यक्रम



लातूर :- मानवी जीवनामध्ये जातीधर्मापेक्षा माणुसकीचा धर्म सर्वश्रेष्ठ आहे. आपण सर्वांना सोबत घेऊन काम केले पाहिजे. कुणाचाही द्वेष न करता प्रेम आणि करुनेने माणसे जोडली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मानवी जीवन अधिकाधिक समृद्ध होईल असे प्रतिपादन भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी नुकतेच केले. वैशाली बुद्ध विहारात अखिल भारतीय भिक्खू संघाच्या कार्याध्यक्षपदी भंदत डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या निवडीबद्दल सत्कार व धम्मदेसना कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी महाविहार, काळेगाव येथील भिक्खू महाविरो थेरो हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून भिक्खू पय्यानंद थेरो (लातूर), भिक्खू नागसेन बोधी (उदगीर), भिक्खू सुमेधजी नागसेन (खरोसा), भिक्खू धम्मासार (किल्लारी) यांच्यासह माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, हृदयरोग तज्ञ डॉ. सदानंद कांबळे आणि माजी नगरसेवक तथा प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्धाच्या प्रतिमेस भिक्खू संघाच्या हस्ते बुद्ध पूजा करण्यात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि भिक्खू महाविरो थेरो यांनी उपस्थिताना त्रिशरण पंचशील प्रदान केले. पुढे बोलताना डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले की, आज मैत्री भाव महत्त्वाचा आहे. मनुष्य हा सत्काराने मोठा होत नाही तर शील आणि चारित्र्याने तो मोठा होत असतो त्यामुळे आपण सातत्याने इतरांविषयी सकारात्मक भावना मनामध्ये ठेवली पाहिजे. आपण प्रत्येकाने माणुसकी जपली पाहिजे तसेच सर्वांनी एकमेकांना जोडले पाहिजे. आजचा सत्कार हा व्यक्तीचा सत्कार नसून तथागताच्या चिवराचा तो सन्मान आहे. सत्कारामुळे आपल्याला आधार मिळून एक नवी ऊर्जा प्राप्त होते असेही ते म्हणाले. यावेळी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड म्हणाले की, प्रत्येक बुद्ध विहारात पाली भाषेचे विद्यालय असले पाहिजे. बुद्ध विहारात नेहमी पाली भाषा संवर्धनाचे काम व्हावे अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमात डॉ. सदानंद कांबळे आणि सचिन मस्के यांची समायोजित भाषणे झाली. तसेच कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे प्राचार्य म्हणून डॉ. दुष्यंत कटारे आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे डॉ. संजय गवई यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. उपगुप्त महाथेरो यांची अखिल भारतीय भिक्खू संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वैशाली सार्वजनिक बुद्ध विहाराच्यावतीने केशव कांबळे, सूर्यभान लातूरकर, जगन्नाथ सुरवसे, दामू कोरडे, गौतम चिकाटे, हरिश्चंद्र सुरवसे, लता चिकटे, लता कांबळे, निळूबाई कांबळे, लता गायकवाड, मीना सुरवसे आदींनी चिवर, मानचिन्ह व पुष्प देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी विनोद खटके यांनी वैशाली बुद्ध विहाराला दहा हजार रुपयांचे दान दिले त्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी भिक्खू महाविरो थेरो यांची धम्मदेसना झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल सुरवसे, धनराम कांबळे, गोपाळ चिकटे, अशीत कांबळे, कुणाल कांबळे, वसंत वाघमारे, सूर्यकांत दांडे, आनंद सोनवणे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाची सांगता धम्मपालन गाथेने करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले तर आभार सूर्यभान लातूरकर यांनी मानले. या कार्यक्रमाला लातूर शहरातील विविध भागातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर बेडग मधील आंबेडकरवादी समाज बांधवांचा विजय झाला - सरिता कांबळे




नवी मुंबई / के एच. हनवते :- नेरूळ नवी मुंबईतील समाजसेविका सरिता चंद्रकांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई - पुणे हायवे चक्काजाम आंदोलन एल पी नेरूळ नवी मुंबई येथे घेण्यात आले होते त्या आंदोलनाची दखल व बेडग गावातील समाज बांधवांनी माणगाव ते मुंबई मंत्रालय लॉन्ग मार्चची दखल महाराष्ट्र शासनाने घेऊन प्रज्ञासूर्य, महामानव, बोधिसत्व, अधुनिक भारताचे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सुसज्ज स्वागत कमान मु. पो. बेडग, तालुका मिरज जिल्हा सांगली येथे बांधणे करता आदेश दिले. स्वागत कमान बांधण्याकरता उहेझरीं बेडग गाव, मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सुसज्ज स्वागत कमान उभारण्या संदर्भात महाराष्ट्र शासनाचा आदेश ८० लाख निधी मंजूर त्यातील पहीला टप्पा म्हणून ३० लाख सांगली जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिली शासनाने एकूण ८० लाख ची मंजूर दिली आहे त्यातील पहिला टप्पा ३० लाख म्हणून मंजुरी माननीय, जिल्हाधिकारी सांगली यांनी दिली म्हणून महाराष्ट्र शासनाचे जाहीर धन्यवाद... या आंदोलनामध्ये नेरूळ नवी मुंबईतील असंख्य धम्म बांधव कार्यकर्ते चंद्रकांत कांबळे, बाबा न्यायनीत, श्याम सोनवणे, कल्याणराव हनवते, वानाबाई निकम, नीतातार्इ बिराजदार, आशाताई खंदारे, बेबीताई गायकवाड, प्रतिभाताई आठवले, वनिता बनसोडे, ठाण्याहून भिम क्रांती संघटना उबाळे साहेब, मंगेश सादरे साहेब, आणि समस्त समविचारी पक्ष व बौध्द - आंबेडकरी समाज बांधवांनी या आंदोलनात पुढाकार घेतला. हा आपल्या समाज एकजुटीचा विजय आहे आसे समाजसेवक चंद्रकांत कांबळे यांनी प्रसिद्धी माध्यमांकडे आपले मत व्यक्त केले.

# मराठ्यांना टिकाऊ आरक्षण देण्याच्या मागणीसाठी १ नोव्हेंबर पासून आमरण उपोषणास बसणार अ . भा. छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांची माहिती



लातूर : महाराष्ट्रात अनेक सरकारे आली आणि गेली. पण अद्यापपर्यंत ४० वर्षांपासूनची मागणी असलेला मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न कोणत्याही सरकारने सोडवला नाही. त्यामुळे राज्यातील विद्यमान सरकारने मराठा समाजाला टिकाऊ आरक्षण द्यावे, या मागणीसाठी आपण येत्या १ नोव्हेंबरपासून मराठ्यांचे क्रांतिसूर्य आण्णासाहेब जावळे पाटील यांच्या औसा तालुक्यातील टेंभी या समाधीस्थळाजवळील राज्य महामार्गावर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती अ . भा. छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत दिली. मराठा समाजातील ज्येष्ठ नेत्यांनी मराठ्यांचा राजकीय स्वार्थासाठी वापर करून घेण्याचे काम आजपावेतो केले आहे. म्हणूनच आरक्षणाचा हा प्रश्न अजूनही सुटू शकलेला नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना सरसकट कुणबी मराठा समाजाची प्रमाणपत्रे देण्याची मागणी केली आहे. मराठ्यांच्या आरक्षणासाठी त्यांच्या उपोषणास आपला पाठिंबाच आहे. पण सरकारनेच सरसकट कुणबी मराठा प्रमाणपत्रादेत येणार नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे मराठ्यांना टिकाऊ आरक्षण देण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटना आता रस्त्यावर उतरणार आहे, सांगून नानासाहेब जावळे पाटील पुढे म्हणाले की, येत्या दि. १ नोव्हें. रोजी दुपारी १२ वाजता औसा तालुक्यातील टेंभी येथील आण्णासाहेब जावळे पाटील यांच्या समाधीस्थळावर आपण छावा संघटना आणि सकल मराठा समाजाची महासभा घेणार आहोत. त्या महासभेत पुढील दिशा स्पष्ट करणार आहोत. मराठा समाजाचे वाटोळे मराठा समाजातील नेत्यांनीच केले आहे. त्यामुळे आता जीव गेला तरी आपण टिकाऊ आरक्षण मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही. आपल्या आमरण उपोषणादरम्यान छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कांही उद्रेक केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य सरकारची राहील. यापुढे मराठ्यांची कोणत्याही परिस्थितीत आरक्षणाच्या मागणीवरून आपण फरपट होऊ देणार नाही, असेही जावळे पाटील यांनी सांगितले. आरक्षणाच्या मागणीचा हा लढा काही नवीन नाही. मागच्या ४० वर्षांपासून ही लढाई चालूच आहे. त्यामुळे सरकारने आता समोर येऊन आपली भूमिका स्पष्ट करावी,अशी मागणीही त्यांनी केली आहे. सरकारने आतापर्यंत मराठ्यांना मतापुरतेच गृहीत धरले आहे. यापुढे असे गृहीत धरू देणार नाही, तर सरकारला चांगलाच धडा शिकवू. सरकारने सुद्धा हा मुद्दा आता तुटेपर्यंत ताणून धरण्याची चूक करू नये. आजही काही नेतेमंडळी जाती - जातीत भांडणे लावण्याचे काम करतांना दिसतात. अशा नेत्यांनी आता पूर्वी केलेल्या चुका करण्याचे धाडस करू नये. आज केंद्रात भाजपचे आणि महाराष्ट्रातही भाजप - मित्र पक्षाचे सरकार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधानांना कायद्यात बदल करायला सांगून मराठ्यांना टिकाऊ आरक्षण अथवा हक्काचे १६ टक्के आरक्षण मिळवून द्यावे,अशी मागणी जावळे पाटील यांनी केली. शिंदे - फडणवीस- पवारांच्या कार्यकाळात मराठ्यांना आरक्षण मिळत नसे तर पुन्हा कधीच आरक्षण मिळणार नाही,असा पुनरुच्चारही त्यांनी केला. याप्रसंगी छावा संघटनेचे सल्लागार प्रा. सत्यशील सावंत यांच्यासह छावा संघटनेचे पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

# बाभळगाव येथील पारंपारीक दसरा महोत्सवास ऊपस्थित रहाण्याचे ग्रामपंचायतचे आवाहन

लातूर प्रतिनिधी : २३.१०.२३ दसरा विजयादशमी निमित्ताने यंदाही बाभळगाव ग्रामपंचायतच्या वतीने विजयादशमी दसरा उत्सव साजरा केला जाणार आहे. या सामुहीक सीमोल्लघन उत्सवास माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख, आदरणीय श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख उपस्थित राहणार आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून आजही बाभळगाव येथे विजयादशमी दसरानिमित्त सर्वधर्मीयाकडून सामूहिक सिमोल्लंघन साजरा केले जाते. ही परंपरा बाभळगाव येथे अनेक वर्षापासून पाळली जाते. मंगळवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.०५ वाजता सामुहीक सीमोल्लघन उत्सव साजरा होणार आहे. बाभळगाव ग्रामपंचायतकडून प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही आयोजित विजयादशमी दसरा सामूहिक सिमोल्लंघन उत्सवासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बाभळगाव ग्रामपंचायत सरपंच सौ. प्रिया सचिन मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख तसेच बाभळगाव ग्रामपंचायत सदस्य व व ग्रामस्थानी केले आहे.

# जातीवादी दिलिप जाधव चेरेकर याला पनवेल पोलीसांनी केली अटक अशा जातीवादी गुंडाला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे..!

**रिपाई (ए) राष्ट्रीय अध्यक्ष दिपक (भाऊ) निकाळजे यांच्या आदेशानुसार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र (दादा) गायकवाड यांनी केली मागणी**




नवी मुंबई / के. एच. हनवते :- पहिली गोष्ट तर आम्ही कोणाच्या नादी लागत नाही आणि आमच्या नदी लागणार्याला आम्ही कधीच सोडत नाही. सोशल मीडियावर अनुसूचित जाती जमाती विरुद्ध महिला विषय फेसबुक वर घानेरडे व्यक्तव्य करून समाजाला शिवीगाळ आणि अनुसूचित जातीच्या महिला विरुद्ध घाणेरडे व्यक्तव्य करणाऱ्या जातीयवादी गुंड दिलीप जाधव चेरेकर यांनी पुण्यातून पनवेल पोलिसांनी अटक केली आहे. यात अँड. अमित कटानवरे यांनी या जातीयवादी व्यक्ती विरुद्ध कायदेशीर मार्गाने कारवाई करत त्याला काल पाच दिवसांची पोलीस कोठडी अशी सजा दिली आहे. यावेळी पनवेल पोलीस स्टेशन येथे साक्षीदार निवास भाऊ साबळे - रीपाई (ए) नवी मुंबई सरचिटणीस यांनी उपस्थित राहून साक्ष दीली. यावेळी पनवेल पोलीस स्टेशन येथे रीपाइ (ए) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र (दादा) गायकवाड, व ऐरोली विधानसभा अध्यक्ष अमोल जावळे, बेलापुर विधानसभा उपाध्यक्ष माणिक कांबळे उपस्थीत होते. या प्रसंगी प्रसंगी रीपाई (ए) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अध्यक्ष राजेंद्र (दादा) गायकवाड यांनी प्रशासनास विनंती केली आहे की, फास्ट ट्रॅक कोर्टात ही केस चालवून या जातीयवादी व्यक्तीला कठोरात कठोर शासन करावे व त्याला फाशीची शिक्षा द्यावी जेणेकरून पुन्हा कोणीही आसे कृत्य करणार नाहीत

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते भंदत डॉ. उपगुप्त महाथेरो यांचा सत्कार



लातूर :- क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते भंदत डॉ. उपगुप्त महाथेरो यांचा सत्कार बौद्ध धम्म प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, सातकर्णी नगर, रामेगाव, जि. लातूरचे अध्यक्ष भंदत डॉ. उपगुप्त महाथेरो यांची नुकतीच अखिल भारतीय भिक्खू संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली त्यानिमित्ताने राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी बौद्ध धम्म प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव पू. भिक्खू पय्यानंद थेरो, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि सामाजिक कार्यकर्त्या शोभाताई सोनकांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी ना. संजय बनसोडे म्हणाले की, संपूर्ण मराठवाड्यासह महाराष्ट्रात धम्म चळवळ आपल्या मार्गदर्शनाने अधिक गतिमान होत आहे. तसेच आपली अखिल भारतीय भिक्खू संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली ही आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. तसेच येणाऱ्या धम्म परिषदेमध्ये लातूर जिल्ह्यातील सर्व धम्म बांधवांना सहभागी करून घेण्यासाठी आपण प्रयत्न करावे असे सांगून त्यांनी पुढील कार्यासाठी त्यांना हार्दिक दिल्या. यावेळी पू. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी सहावी अखिल भारतीय धम्म परिषद सातकर्णी नगर, रामेगाव जि. लातूर येथे संपन्न होत आहे. या परिषदचे निमंत्रण त्यांनी याप्रसंगी त्यांना दिले.

# माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकराकडुन पुरोहित परिवाराचे सात्वंन



लातूर/ प्रतिनिधी :- लातूराच्या शैक्षणीक क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तीमत्व व दयानंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य कन्हैयालाल पुरोहित यांचे नुकतेच वृध्दापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यामुळे माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी पुरोहित केशरिया निवासस्थानी भेट देवून त्यांच्या परिवाराचे सात्वंन केले. माजी प्राचार्य पुरोहित यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी आ.निलंगेकर यांनी सर्व सोयींनी युक्त अशा अद्ययावत लातूर विज्ञान केंद्राची लवकरात लवकर उभारणी केले जाईल यासाठी प्रयत्न करू व खर्या अर्थाने हिच दिवंगत प्राचार्य कन्हैयालाल पुरोहित सरांना आदरांजली असेल अशी भावना व्यक्त केली. प्राचार्य कन्हैयालाल पुरोहित सरांची शिक्षण व विज्ञानाप्रति समर्पण भावना होती. सतत विद्यार्थ्यांना प्रेरक कार्यात ते व्यस्त असत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लातुरात अद्ययावत विज्ञान केंद्र उभारले जावे, या तळमळीतून सरांनी या विषयाचा पाठपुरावा केला. मंत्री पदाच्या कार्यकाळात हा विषय मार्गी लावण्यात यश आले. मात्र सरांच्या हयातीत विज्ञान केंद्राचे कार्य तडीस गेले नाही. यापुढील काळात लवकरात लवकर लातुरात अद्ययावत विज्ञान केंद्र उभारले जाऊन दिवंगत प्राचार्य कन्हैयालाल पुरोहित सरांचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी कटिबद्ध राहू, असा निर्धार माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला. यावेळी कोलीन पुरोहित, रोहित पुरोहित, चंद्रकांत पुरोहित, जावई सुमनकुमारजी जोशी, अमोल गोवंडे, शेषराव ममाळे होते.

# ह.भ.प.गहिणीनाथ महाराज यांचे कव्हेकर परिवारातर्फे सत्कार



लातूर दि.२३-१०-२०२३ मंगळागौरी सार्वजनिक नवरात्र महोत्सव, मजगे नगर,लातूर यांच्यावतीने ह.भ.प.गहिणीनाथ महाराज यांच्या भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या निमित्ताने ह.भ.प.गुरूवर्य गहिणीनाथ महाराज औसेकर यांनी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांच्या कैलास निवासस्थानी भेट दिली. यावेळी ह.भ.प.गहिणीनाथ महाराजांचा शाल, पुष्पगुच्छ व विठ्ठलाची मूर्ती भेट देऊन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, भाजपा युवा मोर्चाचे मा.शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठराव पवार, गौरचे सरपंच रोहित पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, नगरसेवक बालाजी शेळके, ज्ञानेश्वर चाटे, ज्ञानोबा रूकमे आदी मान्यवर उपस्थित होते.

# वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन शैक्षणिक प्रगती साधण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे - निळकंठराव पवार



लातूर दि.२३-१०-२०२३ जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून केले जाते. अध्यात्म, विज्ञान व व्यावसायीकतेवर आधारित शिक्षणातून तेजस्वी तरूण घडविण्याचे काम केले जाते. तसेच यापुढील कालावधीतही विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज, बदलता काळ, संस्थेचा उद्देश व वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन शैक्षणिक प्रगती साध्यण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे, असे प्रतिपादन जेएसपीएम संस्थेचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार यांनी केले.यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटेक्निकच्यावतीने आयोजित पालक मेळाव्यात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अभय वावरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य दयानंद हासबे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख महेश आदमिले आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्राचार्य अभय वावरे यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील संवादाचे महत्त्व उपस्थितांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित पालकांपैकी काही मोजक्या पालकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार साहेल शेख यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE